मराठी भाषेत प्रकाशित ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील वाचन साहित्याचे ग्रंथसूचीय व आशय विश्लेषण

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

अंतरविद्या शाखा अंतर्गत

ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

सटवाजी किशनराव वाहूळकर

मार्गदर्शक

डॉ. राजीव पैठणकर

असि. प्रोफेसर

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळाचे तोष्णिवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली

मे २०२५

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठक्र.
1	प्रस्तावना	1
2	पुर्वप्रकाशित साहित्याचा आढावा	2-3
3	विषय निवडीचे कारण	4
4	अभ्यास विषयाचे महत्व	4-5
5	संशोधनाची उदिष्टे	9
6	संशोधनाची गृहितके	9
7	संशोधनाची पध्दती व तंत्रे	10
8	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	11
9	प्रकरण रचना	11
10	संदर्भ सुची	12-13

मराठी भाषेत प्रकाशित ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील वाचन साहित्याचे ग्रंथसूचीय व आशय विश्लेषण

1. प्रस्तावना Introduction:

भाषा हे ज्ञान निर्मिती व वितरणाचे प्रमुख माध्यम आहे. भाषा हे मानवाला परस्परांशी जोडण्याचे कार्य करते. जागतिक शिक्षण तज्ज्ञांनी मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम हवे हि शिफारस अनेक आयोग व अभ्यासातून केली आहे. विकसित देशात उच्च शिक्षण व संशोधनाची भाषा हि त्यांची मातृभाषाच आहे. उदा. जपान, चीन, अमेरिका, फ्रान्स, रशिया, इंग्लंड इ. भारतात विविध शासकीय शिक्षण समित्यांनी मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे अशी भूमिका मांडली आहे व भारत सरकारने सुद्धा हे मान्य केले आहे. १०+२+३ या रचनेतील शिक्षणात मातृभाषा हे माध्यम शासनाने स्वीकारले आहे. इं.स. १९४७ नंतर भारतात उच्च शिक्षण विस्तारले आहे. ग्रामीण भारतात सुद्धा उच्च शिक्षणाच्या संस्था वेगाने वाढत आहेत.

भारतात उच्च व तंत्र शिक्षणात प्रादेशिक भाषेत संदर्भ साहित्याची निर्मिती स्वातंत्र्यानंतर शासकीय धोरण म्हणून स्वीकारली यासाठी वैज्ञानिक व तांत्रिक शब्दावली आयोग भारतीय संविधान भाग ४ कलम ३४४ नुसार राष्ट्रपतींच्या आदेशाने १ ऑक्टोबर १९६१ साली स्थापन केला. इंग्रजी भाषेतील शब्दांना पर्यायी भारतीय शब्द तयार करण्यासाठी कार्यशाळा व प्रशिक्षणे नियमित आयोजित केली जातात. या आयोगाने भारतातील मान्यताप्राप्त प्रादेशिक भाषांत संदर्भसाधने प्रकाशीत केली आहेत. मातृ भाषेतून तून शिक्षण हे विकासाचे लक्षण आहे हि भारत सरकारची भूमिका आहे म्हणून मध्यप्रदेशात वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेच्या हिंदी भाषेतील पुस्तकांचे १६ ऑक्टोबर २०२२ ला पंतप्रधानांच्या हस्ते प्रकाशन केले. भविष्यात उच्च व तंत्र शिक्षणाच्या सर्वशाखात भारतीय भाषा आणि ज्ञान यांना अधिस्विकृत करण्याचे धोरण राबविले जाईल.

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थात मराठी भाषेत शिक्षणाची सुविधा आहे. विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर मराठी माध्यम सर्वमान्य होत आहे. सामाजिक शास्त्रे, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कृषी या शाखेत मराठी माध्यमातून शिक्षण व संशोधनाची व्याप्ती वाढत आहे. इंग्रजी भाषा आणि माध्यम मराठी भाषिक विद्यर्थ्यांना आकलनाच्या पातळीवर कठीण आहे केवळ भाषा आणि माध्यम यासाठीच त्यांची प्रगती थांबविणे उचित नाही. मराठी भाषा आणि माध्यम यांना उच्च शिक्षणात केंद्रस्थानी आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ स्थापना दिनांक १९ नोव्हेंबर १९६० या मंडळाच्या द्वारे संदर्भ ग्रंथासाठी स्वतंत्र प्रकाशन विभाग निर्माण केला. या प्रकाशन विभागाने मराठी भाषा, साहित्य, सामाजिक शास्त्रे , विज्ञान, कृषी शिक्षण, तंत्र व वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित महत्वाचे ग्रंथ प्रकाशित केले आहेत या मंडळाच्या संकेत स्थळावर ६५० हुन अधिक संदर्भग्रंथांची यादी उपलब्ध आहे. मराठी भाषेत दर्जेदार संदर्भ साहित्य निर्माण करण्यासाठी या मंडळाकडून अनेक योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठ व संशोधन संस्थानी मराठी भाषिक विद्यार्थी उच्च शिक्षणात इतरांपेक्षा मागे राहू नये यासाठी पुढाकार घेऊन मराठी भाषेत संदर्भ साधने प्रकाशित केली आहेत. मराठी प्रकाशन संथानी देखील यात योगदान दिले आहे.

२. पूर्व प्रकाशित साहित्याचा आढावा Review of Litrature

प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित पूर्वप्रकाशित संदर्भ साधनांची निर्मिती ही महाराष्ट्राच्या मातृभाषेतून झालेली आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाचे दर्जेदार संदर्भ साधने निर्माण झालेली आहेत. महाराष्ट्रातील मराठी भाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तिचे माध्यम हे मराठी भाषा आहे.

- ग्रंथालय व माहितीशास्त्र वस्तुनिष्ठ सेट नेट परिक्षा प्रा. लक्ष्मण थोरात
- ग्रंथालय व माहितीशास्र परिभाषा कोष मराठी इंग्रजी डॉ. सु.प्र. सातारकर, डॉ. उद्धव रा. जाधव, कोष घाड़मय म्हणजे काय व कोषाचे प्रकार याचे वाचन केले.
- ग्रंथालय आणि माहितीशास्र आधुनिक तंत्र आणि पध्दती डॉ. धर्मगज विर, डॉ. राहुल देशमुख, प्रा. हितेष ब्रिजवासी
- ग्रंथालय आणि माहिती केंद्राचे व्यवस्थापन सौ. राजलक्ष्मी खेडकर
- संशोधनातील गुणवत्ता एक दिशादर्शन संपादन डॉ. अनंत जोशी
- संदर्भ सेवा आणि संदर्भ साधने, अनुवाद डॉ. वसंत विष्णु कुलकर्णी
- य.च.मु. नाशिक भाग १ व २ पुस्तकालय एवं सुचना विज्ञान
- मुकेश बोरा, उदय भान, अतिमकुमार, अमितकुमार निरंजन अरिहंत प्रकाशन पब्लिकेशन इंडीया कालिदी टीपि नगर मेरठ युपी
- डायमंड ग्रंथालय माहिती कोष डॉ. एम.बी. कोण्णुर डायमंड पब्लिकेशन
- महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे
- महाराष्ट्र स्टेट गॅझेटीअर्स
- ग्रंथालय माहिती शाख सेट नेट अभ्यासक्रमाप्रमाणे एम.व्ही. कुलकर्णी फडके प्रकाशन कोल्हापुर दूसरी आवृत्ती २००५
- भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संधी आणि आव्हाने मुख्य संपादक डॉ.सदाशिव हरीभाऊ सरकटे विद्यावार्ता हर्षवर्धन पब्लिकेशन बीड संपादक डॉ.बापू घोलप

- संदर्भ सेवा व साहित्य शोध माहितीसेवा आणि तंत्र पु.क्र. ४० य.च.मू.वि. नाशिक
- ग्रंथालयातील संदर्भ सेवा मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ संभाजीनगर
- ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकिकरण डॉ. दत्तात्रय नारायण फडके पुणे

३. विषय निवडीचे कारण :

प्रस्तुत संशोधन कार्यात सामाजिकशास्त्र या विद्याशाखेचा एक महत्त्वाचा घटक असलेल्या ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाच्या मराठी भाषेतील वाचन साहित्याचा ग्रंथसुचिय आशय विश्लेषणात्मक अभ्यास योजिला आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठ ज्ञान स्रोत केंद्रात उपलब्ध असलेल्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाच्या वाचन साहित्याचे मूल्यमापन आणि आशय विश्लेषण करणे, प्रकाशित आणि उपलब्ध साहित्य तपासणे, ग्रंथ निर्मितीचा उद्देश आणि व्याप्ती अभ्यासणे एखाद्या विषयाचे शैक्षणिक व संशोधनात्मक मूल्य आणि महत्त्व किती आहे ते त्या विषयात मुद्रित वाचन साहित्याची निर्मिती आणि उपलब्धता यांचे प्रमाण किती आहे यावर अवलंबून आहे पंचालय व माहितीशास्त्र या ज्ञानशाखेत मान्यताप्राप्त व लोकप्रिय होण्यासाठी बाचन साहित्य विपुल व दर्जेदार असणे आवश्यक आहे. या हेतुने हा विषय निवडला आहे. ग्रंथालय व माहितीशास्र या विषयातील मराठी भाषेत प्रकाशित दर्जेदार उपलब्ध वाचन साहित्याचे वाचन करून तसेच संबंधित विषयाचे नियतकालीके, वर्तमानपत्र, साप्ताहिक, लेख, विविध प्रकारचे वाचन साहित्याची पाहणी करून मराठी भाषेत प्रकाशित "ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील वाचन साहित्याचे ग्रंथसूचीय व आशय विश्लेषण" हा विषय निवडण्याचे ठरवले आहे.

४. अभ्यासविषयाचे महत्त्व Importance of Significant:

ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाचे शिक्षण महाराष्ट्रात पदविका ते विद्ययाचस्पती (Certificate to Ph.D.) या व्यापक पातळीवर दिले जाते. या सर्वच अभ्यासक्रमांना मराठी माध्यमात परीक्षा देण्याची परवानगी आहे. शिक्षण संशोधन व प्रशिक्षणया प्रक्रियांचे महत्वाचे केंद्रबिंदू म्हणजे वाचन साहित्य आहेत. इंग्रज काळातील मराठी सार्वजनिक वाचनालय चळवळ ते आधुनिक विद्यापीठ संशोधन विभाग अशा विस्तृत पटावर दीर्घ कालावधीत ग्रंथालय व माहिती शाखाशी संबंधित अनेक पैलूवर विविध प्रकारचे लिखाण मराठी भाषेत प्रकाशित झाले आहे. ग्रंथालय शास्त्र विषयातील मराठी वाचन साहित्याचा ऐतिहासिक विकास व योगदान काय आहे.

वाचन साहित्याची उपलब्धता, व्याप्ती आणि उद्देश. विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्रांना भेटी आणि विद्यापीठ ग्रंथपाल प्राध्यापक यांच्या मुलाखती घेणे विविध व्यक्ती आणि संस्था यांचा अभ्यास. प्रकाशक व्यावसायिकांच्या भेटी व मुलाखतीचा या अभ्यासात समावेश आहे. वाचन साहित्याचा मान्य प्रकारानुसार या विषयातील वाचन साहित्याचे. आशय विश्लेषण आणि मूल्यमापन करणे. विद्यापीठांच्या ज्ञानस्रोत केंद्रात उपलब्ध असलेल्या वाचन संदर्भ साहित्याचे विश्लेपण करणे. वाचन साहित्याच्या तांत्रिक बाबीचा सुद्धा समावेश या संशोधनात केला आहे. उदा. बांधणी, आकार, किंमत ई. ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात " सिद्धांत कमी आणि व्यवहार अधिक " (Less theory and more practices) या प्रमाणे उपयोजकांना सेवा देण्यासाठीची तंत्रे व साधने महत्वाची ठरतात.

१.१ ग्रंथसूची म्हणजे काय : ग्रंथसूची म्हणजे ग्रंथनामाचा संग्रह होय. कोणत्याही एका विषयावरील पुस्तकांची यादी, लेखक नामे, त्यांची टोपन नावे.

व्याख्या: १) द ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी: एका विशिष्ट विषयाची साहित्यातील विषय विशिष्ट लेखकाची, प्रकाशकाच्या पुस्तकांची यादी म्हणजे ग्रंथसूची होय.

२) व्हॅन हयुईसन ग्रंथसूची म्हणजे ग्रंथाचे अचुक वर्णन करण्याची कला किंवा शास्त्र होय.

१.२ आशय विश्लेषण (Content Analysis):.

ग्रंथ, नियतकालीके, शासकीय प्रकाशणे, संप्रेषण माध्यमांच्या काही अंतर्गत वैशिष्ट्यांचा शोध घेण्यासाठी ज्या उपयुक्त पद्धतीचा वापर करतात. त्यापैकी आशय विश्लेषण एक पद्धती आहे. मुद्रित वाचन साहित्यामध्ये समाविष्ट असलेले शब्द (phrases) संज्ञा, विषय themes अक्षरे, वाक्य आणि काही प्रमाणात परिच्छेद हे किती वेळा ग्रंथाच्या पाठ्यामध्ये येतात. त्याच्या वस्तुनिष्ठ पृथ्थकरणासाठी जी प्रक्रिया वापरण्यात येते त्याला आशय विश्लेषण असे म्हणतात.

1. बनार्ड बेरेल्सन : संप्रेषणाच्या बहुढंगी आशयाचे वस्तुनिष्ठ, पध्दतशिररित्या आणि संख्यात्मक वर्णन करण्यासाठी वापरलेली संशोधन प्रक्रिया म्हणजे आशय विश्लेषण होय.
2. पी. व्ही. यंग : मुलाखती, प्रश्नावली, अनुसुची इ. लिखित, मौखिक साधनाच्याद्वारे संकलित केलेल्या तथ्यांचा पध्दतशिर, वस्तुनिष्ठ व प्रमाणबध्द, अर्थविषद करण्याच्या संशोधनात्मक तंत्राला आशय विश्लेषण म्हणतात.
3. Kaplan: The techniques knows as content analysis attempts to characterize the meaning in given body of disclosure is a systematic and quantitatives fashion.

4. संशोधन प्रक्रियेतील पूर्वगृहदुषित दृष्टिकोन कमी करणे आणि संशोधनात अचूकता परिपूर्णता आणणे हे आशय विश्लेषणाचे हेतू आहेत.

२. महाराष्ट्रातील ग्रंथालयशास्त्र शिक्षणचा विकास :

ग्रंथालयाचा विकास "Palm leaf to palm top" या प्रमाणे प्राची काळापासून आतापर्यंत झाला आहे. ग्रंथालय शिक्षण आणि प्रशिक्षण यांचा विकास औदयोगिक क्रांतीनंतर यूरोप व अमेरिकेत झाला. भारतात ग्रंथालयशास्त्र शिक्षणाची सुरुवात होऊन १११ वर्ष झाली आहेत, स्वातंत्रपूर्व काळात १९११ मध्ये बडोदे संस्थानातं महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ग्रंथालये सुरु केली. प्रशिक्षित अमेरिकन अधिकारी डब्लू. ए बोर्डेन यांच्या मदतीने इंग्लिश गुजराती आणि मराठी या भाषांतून ग्रंथालयाच्या कर्मचारी वर्गाना शिक्षण दिले. १९५० च्या दशकामध्ये भारतीय विद्यापीठात ग्रंथालयशास्त्र या विषयाचे शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम या स्वरूपात सुरु झाले.

इंग्रजी हे या विषयाचे माध्यम होते. १९४० ते ५० च्या दशकामध्ये भारतीय विद्यापीठात ग्रंथालयशास्त्र या विषयाचे शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम या स्वरूपात सुरु झाले. इंग्रजी हे या विषयाचे माध्यम होते. अर्धवेळ वर्ग चालत आणि ग्रंथालयतील कर्मचारी यानाचअभ्यासक्रमासाठी परवानगी होती. प्रमाणपत्र ते १ वर्ष पदविका आणि १९४७ पर्यन्त शिक्षणाचा विकास झाला. मुंबई विद्यापीठात १९४४ ला प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु झाला.

१९४७ नंतर स्वतंत्र भारतामध्ये उच्च शीक्षण व संशोधनाच्या विकासासाठी अनेक आयोग नेमून संस्था आणि अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली. दिल्ली विद्यापीठाने १९४९ मध्ये एम. लिब आणि Ph.Dअभ्यासक्रम सुरु केले. १९५६ मध्ये बडोदा आणि नागपूर विद्यापीठाने शिक्षणक्रम सुरु केले. १९७३ आणि १९७७ मध्ये दिल्ली विद्यापीठात आयोजित केलेल्या कार्यशाळेत विदयापीठ अनुदान आयोगाच्या संमतीने २ वर्ष एम.लिब शिक्षणक्रमाला मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात १९८१ मधील आकडेवारीप्रमाणे ग्रंथालयशास्त्राचे

व्यवसायिक शिक्षण २ संस्थातून सुरु होते त्यामध्ये विद्यार्थीसंख्या ८० आणि ९ शिक्षक कार्यरत होते.

२.१ मराठी भाषेतील प्रकाशित ग्रंथालय व माहिती शास्त्र या विषयाचे मुद्रित वाचन साहित्याचा आढावा.

ग्रंथालयशास्त्राशी संबंधित संदर्भ साहित्यात

१. सामाजिक शास्त्र संशोधन पुस्तके

२. माहिती व तंत्रज्ञांनाची मराठी पुस्तके

३. वाचनसंस्कृती ची पुस्तके

४. निवडक ४ ते ५ नियतकालिकांचा अभ्यास

५. निवडक गौरव ग्रंथाचा अभ्यास.

६. संगणकांची प्रारंभिक माहिती देणारी पुस्तके

७. ग्रंथालयशास्रातील संपादित ग्रंथाचा अभ्यास.

८. संदेशवहन आणि माध्यम या संबंधित ग्रंथ अभ्यासासाठी उपलव्ध प्रकाशक १ पुणे

विदयार्थी गृह प्रकाशन (१९८०) चे ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या पुस्तकांपासून मुक्त विद्यापीठाची पुस्तके.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेली पुस्तके.

महाराष्ट्रातील डायमंड प्रकाशन, युनिव्हर्सल प्रकाशन, प्रशांत पव्लिकेशन जळगाव, अथर्व प्रकाशन जळगाव, फडके प्रकाशन कोल्हापूर, विद्याभारती प्रकाशन लातुर, श्लोक प्रकाशन बुलढाणा, प्रज्ञा प्रकाशन नागपूर, सावन्तवाडी

प्रकाशन, विश्व पब्लिकेशन आणि डिस्त्रुबुटरनागपुर अजुनही अनेक प्रकाशक आहेत.

२.२ **वाचन साहित्याच्या प्रकारानुसार साहित्य :**

१.मराठी विश्वकोशात अनेक विस्तृत नोंदी आहेत

२. ग्रंथालयाचे मला माहित असलेले ५ ज्ञानकोश आहेत

३. ग्रंथालयाचे शब्दकोश आणि shorformlongformडिक्शनरी आहेत.

४. नेट आणि सेट या स्पर्धा परीक्षेची ग्रंथ आहेत

५. २०० ते ४०० पृष्ठ संख्या असलेली १०० च्या वर ग्रंथ आहेत

६. ५० ते २०० पृष्ठ संख्या असलेली ९० पेक्षा जास्त पुस्तके आहेत

२.३ **वाचन साहित्य प्रकारानुसार वर्गीकरण व अंतरंग व बाहय स्वरूपानुसार आशय विश्लेषण** :

ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाच्या वाचन साहित्य प्रकारानुसार वर्गीकरण, विश्वसनीयता, उद्देश आणि व्याप्ती, ग्रंथाची रचना, भाषा आणि शैली (प्रतिपादन), गुणवैशिष्टे, आलेख, सारणी, आकडेवारी, चित्रे, आकृती, नकाशे, ग्रंथाचे बाहयरंग, अंतरंग, आशय सुसंगतताबांधणी, छपाई, मुद्रण, आकार, किंमत, आवृत्ती वारंवारिता इ. विश्लेषण करणे :

५. संशोधनाची उद्दिष्टे Objective of Study:

१. मराठी भाषेत प्रकाशित ग्रंथालय व माहितीशास्र मुद्रित वाचन साहित्याचा (ग्रंथ. नियतकालके, प्रबंध इत्यादि) शोधे घेणे.

२. या वाचन साहित्याचे वाचन साहित्य प्रकारानुसार (ग्रंथ, साधेग्रंथ, संदर्भग्रंथ व त्याचे उपप्रकार, पाठ्यपुस्तक, नियतकालीके, प्रबंध इत्यादि) वर्गीकरण करणे.

३. या सर्व वाचन साहित्याचे ग्रंथसुचीय (लेखक, शिर्षक, प्रकाशन वर्ष, उपविषय, प्रकरणे, अंक, खंड, पृष्ठे इत्यादि) विश्लेषण करणे,

४. या सर्व वाचन साहित्याचे बाह्य स्वरूपानुसार (बांधणी, छपाई, मुद्रण, आकार, किंमत, आवृत्ती, वारंवारिता इत्यादि) विश्लेषण करणे.

५. या सर्व वाचन साहित्याचे अंतर्गत स्वरूपाप्रमाणे (भाषाशैली, व्याप्ती, उपयुक्तता, समर्पकता, अधिकृतता, विश्वसनियता, सादरीकरण इत्यादि) आशय विश्लेषण करणे.

६. वाचन साहित्याची ग्रंथसुची तयार करणे.

६. संशोधनाची गृहितके (Hypothesis of the Study)

१. ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील मुद्रित मराठी भाषेत प्रकाशित वाचन साहित्य संग्रहाची माहिती घेणे.

२. या ज्ञानशाखेतील माहिती घेण्यासाठी अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन घेणे,

३. मराठी भाषेतील वाचन साहित्याची विश्सननियता व उपयुक्तता पडताळून पाहणे.

४. शिक्षण व संशोधनात मराठी भाषेत प्रकाशित ग्रंथालय व माहिती शास्त्र या विषयाच्या वाचन साहित्याचे योगदान पडताळणे.

५.मराठी भाषेतील प्रकाशित मुदित वाचन साहित्याचे पृथ्यकरण करणे व वाचन साहित्याच्या प्रकारानुसार आशयाचे मापन करणे.

७. संशोधनाची पद्धती व तंत्रे **Research Methodology & Techniques:**

संशोधन म्हणजे जे संपूर्ण ज्ञानाचे क्षेत्र उपलब्ध आहे त्यामध्येच विस्तार करणे किंवा अजून नवीन माहिती शोधून काढणे यासाठीची प्रक्रिया म्हणजे संशोधन होय विशिष्ट संशोधन पद्धतीचाआणि तंत्राचा उपयोग करून समस्या विधानात नेमकेपणा साधला जातो. संशोधनासाठी लागणारी प्राथमिक आणि दुयम माहिती गोळा करून शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण केले जाते. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे ही संशोधन पद्धती ऐतिहासिक संशोधन पद्धतीमध्ये अधीक उपयोगात आणली जाते. प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली, निरिक्षण, मुलाखत, इंटरनेट या तंत्राचा वापर करण्यात येईल.

८. संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा **Scope and Limitation ofStudy:**

महाराष्ट्रातील मराठी भाषेतील समग्र विषयाच्या संदर्भ साधनांचा संबंध ग्रंथालय व माहिती शास्त्र या विषयाशी आहे हे अभ्यासणे हा अवाका प्रचंड असल्यामुळे केवळ ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाशी संबंधित मराठी भाषेत प्रकाशित मुद्रित वाचन साहित्याचा अभ्यास करणे व १९११ ते २०२४ या वर्षापर्यंत मराठी भाषेत प्रकाशित मुद्रित ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाचा अभ्यास ही या प्रबंधाची व्याप्ती व मर्यादा आहे.

९. प्रकरण रचना Organisation of the Chapter:

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दूसरे : संबंधित साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : मराठी भाषेतील प्रकाशित मुद्रित ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील वाचन साहित्याचे वर्गीकरण.

प्रकरण चौथे : ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाची ग्रंथसुचिय विश्लेषण करणे.

प्रकरण पाचवे : ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाच्या मुद्रित वाचन साहित्याचे बाहय स्वरूपानुसार व अंतर्गत स्वरूपानुसार आशय विश्लेषण करणे.

प्रकरण सहावे : उपसंहार आणि निष्कर्ष

१०. संदर्भ सुची References:

१. मो.रा.वाळंबे : सुगम मराठी व्याकरण व लेखन-नितिन प्रकाश पुणे आवृत्ती ५७

२. डॉ. डी. के. सावंत, डॉ. रवि सरोदे संशोधन पध्दती इगल प्रकाशन पुणे २०२१

३. डॉ. सत्यप्रकाश निकोशे.: ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती प्रज्ञा प्रकाशन नागपूर २००७

४. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र एम.व्ही. कुलकर्णी फडके प्रकाशन कोल्हापुर दुसरी आवृत्ती २००५

५. ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाषा कोष मराठी इंग्रजी. पहिली आवृत्ती डायमंड पब्लिकेशन सदाशिव पेठ लेले संकुल पुणे

६. डॉ कापडे दिपक : संदर्भ सेवा व संदर्भ साधनांचे मुल्यमापन, आवृत्ती २०१५

७. ग्रंथालय आणि माहितीशास्र घटना घडामोडी भाषा अंक ३ ज्ञानगंगोत्री डिसेंबर २००२ य.च.मु.वि.नाशिक.

८. संशोधन पध्दती व संशोधन प्रकाशनाची नितितत्वे प्रशांत पब्लिकेशन जळगांव

९. डॉ. संतोष खिराडे, जयश्री पाटील २००१, सामाजिक संशोधन पध्दती शास्र व तंत्रे साईनाथ प्रकाशन नागपूर २००५

१०. गोगटे, श्री. ब..१९८९ महाराष्ट्र राज्य शिक्षण, मराठी विश्वकोष https://vishwakoshi.marathi.gov.in/40988/

११. शेवाळे मधुकर, जून-नोव्हेंबर २०११, ग्रंथपालांचा इतिहास : आधुनिक काळ, ज्ञानगंगोत्री, नाशिक, य.च. म.मु. https:/srummos.com/pdf/NB-11-12-8_dyangangotri.pdf, ४-८

१२. इंगोले शा. गो. २३.०४.२०२१ग्रंथालय संचनालय : वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार https://bahuvidh.com/marathipratham/22780,०५.१२.२०२२

१३. देशपांडे, अ. पा., विज्ञान तंत्रज्ञान आणि मराठी भाषा, २१.०७.२०२२, https://bahuvidh.com/marathipratham/23574, ०५, १२. २०२२

१४. कुंभार राजेंद्र - ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन प्रथम आवृत्ती २०१३, युनिव्हर्सल प्रकाशन पुणे

१५. shodhaganga.inflivnet.ac.in

संशोधक	**मार्गदर्शक**
सटवाजी किशनराव वाहुळकर	डॉ. राजीव पैठणकर